आकाशवाणी मुंबई

राष्ट्रीय बातमीपत्र - दुपारी १.३० वाजता

१४ ऑक्टोबर २०२६ - बुधवार

**<u>ठळक बातम्या</u>**

- भारताच्या हिंद प्रशांत दृष्टिकोनाच्या केंद्रस्थानी आसियान संघटना असल्याचं संरक्षण मंत्र्यांचं प्रतिपादन

- गेल्या चार वर्षांत भारताचे ३८ देशांशी प्राधान्य व्यापार करार

- महाराष्ट्रात आणखी ४० तालुक्यात दुष्काळ जाहीर

- कॉक्रोच जनता पार्टीच्या २ नेत्यांना ५ दिवसांची पोलीस कोठडी

**आणि**

- बिहारच्या वैशाली जिल्ह्यात गंगा नदीत बोट उलटून १३ जणांचा मृत्यू

<><><><><>

भारताच्या हिंद प्रशांत दृष्टिकोनाच्या केंद्रस्थानी आसियान संघटना असल्याचं संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांनी आज सांगितलं. ते नवी दिल्लीत आसियान -भारत संरक्षण थिंक टँक फोरमला संबोधित करत होते.

भारत आणि आसियान देश एका शांततापूर्ण, स्थिर आणि खुल्या हिंद प्रशांत क्षेत्रासाठी समान धोरण राखून आहेत, असं ते म्हणाले. यंदाचं वर्ष हे या दोघांमधल्या सागरी सहकार्याचं वर्ष आहे, त्यादृष्टीनं सागरी क्षेत्रातली जागरूकता वाढवण्याचं आवाहन त्यांनी केलं. माहितीची देवाणघेवाण सुधारित पद्धतीनं करण्याचं तसंच आपत्कालीन परिस्थितीचा मुकाबला करण्यासाठी क्षमतावृद्धी करण्याचं आवाहनही त्यांनी केलं.

<><><><><>

भारताने गेल्या चार वर्षांत ३८ देशांशी प्राधान्य व्यापार करार केल्याची माहिती वाणिज्य मंत्री पियूष गोयल यांनी दिली आहे. ते आज नवी दिल्लीत ब्लूमबर्ग न्यू इकॉनॉमी फोरममध्ये बोलत होते. जागतिक भागीदारांसाठी देशाची बाजारपेठ खुली करतानाच भारतीय उद्योगांसाठी बाजारपेठेतल्या संधींचा विस्तार करण्याचं शासनाचं उद्दिष्ट असल्याचं ते म्हणाले. २०१४पूर्वी ज्या अर्थव्यवस्थांशी भारताचे व्यापार करार होते, त्यांचा एकत्रित जीडीपी सुमारे

१० ट्रिलियन डॉलर्स इतका होता, आता तो आकडा वाढून ७० ट्रिलियन डॉलर्स इतका झाल्याचं गोयल म्हणाले.

**<><><><><>**

जागतिक पातळीवर सेमिकंडक्टर मूल्यसाखळीमध्ये खर्चाचा विचार करण्याबरोबरच विश्वास आणि सायबर सुरक्षेलाही अधिकाधिक महत्त्व प्राप्त होत असल्याचं केंद्रीय इलेक्ट्रॉनिक्स आणि माहिती तंत्रज्ञान मंत्री अश्विनी वैष्णव म्हणाले. ते आज नवी दिल्लीत आयोजित ब्लूमबर्ग न्यू इकॉनॉमी फोरममध्ये बोलत होते. सेमिकंडक्टर डिझाईन, उत्पादन आणि तयार उत्पादनाची चाचणी या क्षेत्रात एक विश्वासार्ह भागीदार म्हणून प्रस्थापित करण्याचं भारताचं उद्दिष्ट असल्याचंही ते म्हणाले. देशांतर्गत अर्थव्यवस्था बळकट करण्यासाठी आणि जागतिक अनिश्चिततेचा फटका कमी करण्यासाठी सरकार प्रयत्नशील आहे, जेणेकरून अस्थिर काळातही शाश्वत विकास सुनिश्चित करता येईल, असंही ते यावेळी म्हणाले.

**<><><><><>**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी गुजरातचे मुख्यमंत्री म्हणून कामाला सुरुवात केली त्याला २५ वर्षं झाली. या काळात ते आधी गुजरातचे मुख्यमंत्री म्हणून आणि नंतर भारताचे प्रधानमंत्री म्हणून सलग कार्यरत आहेत. जनसेवा ते देशसेवा असा हा प्रवास सेवा आणि सुशासनाच्या मार्गावरुन विकसित भारत २०४७च्या दिशेने होत आहे. सर्वसमावेशक विकास, सामाजिक सक्षमीकरण, आणि समर्पण भावाचा हा प्रवास सर्वसामान्यांच्या जीवनात आमूलाग्र बदल घडवून आणत आहे. यानिमित्तच्या विशेष मालिकेत आज आपण जाणून घेणार आहोत ईशान्येकडच्या राज्यांबाबतच्या ॲक्ट ईस्ट धोरणा विषयी

**होल्ड- व्हीसी ( सेकंद)**

*(ईशान्येकडच्या राज्यांचं महत्त्व ओळखून केंद्र सरकारने २०१४ पासून ॲक्ट ईस्ट पॉलिसी हे विशेष कृती धोरण तयार केलं. तिथल्या अशांततेला आळा घालून स्थैर्य आणि विकासाच्या वाटेवर नेण्यासाठी प्रयत्न केले. ईशान्येकडच्या राज्यात सक्रीय बोडो, कारबी, उल्फा अशा विविध सशस्त्र गटांशी चर्चा करुन समझोता करार केले. परिणामतः दहा हजारापेक्षा जास्त अतिरेकी शरण आले. ईशान्येतल्या हिंसक घटनांमधे ७० टक्क्याहून जास्त घट झाल्याचं केंद्रीय गृहमंत्रालयाच्या आकडेवारीत म्हटलं आहे.*

*अनेक ठिकाणी सैन्यदलांना विशेषाधिकार देणारा अफ्स्पा कायदा मागे घेण्यात आला. बारमाही रस्ते, रेल्वे, पूल इत्यादी बांधकामामधून विकासाला चालना मिळाली. ईशान्येकडची राज्य आता आर्थिक विकासाचं केंद्र बनू लागल्याचं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी २०२३मधे आसाम दौऱ्यात सांगितलं.)*

**<><><><><>**

अन्नपदार्थ, इंधन, कारखान्यात तयार होणारा माल, आणि विजेच्या दरात वाढ झाल्यामुळे घाऊक किंमत निर्देशांकावर आधारित चलनफुगवट्याच्या दरानं दोन आकडी टप्पा गाठला आहे. ऑगस्टमधे हा दर ९ पूर्णांक ९२ शतांश टक्के होता, तो सप्टेंबरमधे ११ पूर्णांक ३९ शतांश टक्क्यांवर पोहोचला.

पश्चिम आशियातला संघर्ष, होर्मुझची नाकेबंदी, आणि त्यामुळे कच्च्या तेलाच्या तसंच खतांच्या पुरवठ्यावर झालेला परिणाम या सर्व बाबींमुळे चालू आर्थिक वर्षात घाऊक किमतींचा आलेख चढता राहीला आहे. गेल्या महिन्यात किरकोळ किमतींवर आधारित महागाईचा दर १ पूर्णांक ३९ शतांशांनी वाढून ९ पूर्णांक ७६ शतांश टक्क्यांवर पोहोचला.

**<><><><><>**

राज्यात आणखी ४० तालुक्यात दुष्काळ जाहीर करण्यात आला असून आता एकूण ३०५ तालुक्यात १२ दुष्काळी सवलती आणि उपाययोजना लागू करण्यात आल्याची माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली. सह्याद्री अतिथीगृहात पार पडलेल्या राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीनंतर माध्यमांशी संवाद साधताना त्यांनी ही माहिती दिली. दुष्काळामुळे अडचणीत सापडलेल्या शेतकऱ्यांच्या बँक खात्यात अग्रीम मदत म्हणून दिवाळीपुर्वी पाच हजार रूपयांची मदत जमा केली जाणार असून त्याची तात्काळ अंमलबजावणी करण्यात येणार असल्याचं मुख्यमंत्र्यांनी सांगितल.

**होल्ड... बाईट- मुख्यमंत्री**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी शासनाचे प्रमुख म्हणून २५ वर्षं पूर्ण केल्यानिमित्त राज्य सरकारने त्यांच्या अभिनंदनाचा ठराव मंजूर केल्याचं मुख्यमंत्री यावेळी म्हणाले. अथक राष्ट्रसेवेच्या माध्यमातून नरेंद्र मोदी यांनी गरीब आणि वंचितासाठी जे कार्य केलं, आपण प्रधानमंत्री नसून प्रधानसेवक आहोत या भूमिकेतून त्यांनी कार्य केलं, त्याचा उल्लेख या ठरावात करण्यात आला आहे, असंही त्यांनी यावेळी सांगितलं.

दिल्लीच्या राज्य मंत्रिमंडळानेही प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या अभिनंदनाचा प्रस्ताव मंजूर केला.

<><><><>

दिल्लीच्या विशेष कार्यकारी दंडाधिकारी न्यायालयानं आज कॉक्रोच जनता पार्टीचे नेते सौरव दास आणि आशुतोष रांका यांना पाच दिवसांची न्यायालयीन कोठडी दिली, तर अजिंक्य शिंदे यांची वैयक्तिक जातमुचलक्यावर सुटका केली. आंदोलनस्थळ म्हणून जंतर मंतरचा दर्जा काढून घेतल्यानंतरही हे सर्व जण  तिथे जाण्याचा प्रयत्न करत होते, या कारणावरून त्यांना अटक केल्याचं पोलिसांनी सांगितलं.

<><><><>

मुंबई उपनगर जिल्हाधिकारी सौरभ कटियार यांच्याकडे महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या सचिवपदाचा अतिरिक्त कार्यभार आज सोपवण्यात आला. आधीचे अध्यक्ष महेंद्र हरपाळकर यांचा कार्यकाळ  प्रशासकीय कारणास्तव संपुष्टात आणल्यानं कटियार यांच्याकडे कार्यभार सोपवल्याचं राज्य सरकारनं आज काढलेल्या  आदेशात म्हटलं आहे.

<><><><>

नीट पेपरफुटी प्रकरणी सीबीआयनं आज शेषराव ऊर्फ राज सूर्यवंशी याच्या विरोधात दिल्ली न्यायालयात पुरवणी आरोपपत्र सादर केलं. नांदेडचा रहिवासी असलेला शेषराव हा नीट पेपरफुटी प्रकरणात सह-आरोपी शुभम खैरनार याचा सहकारी असल्याचं सीबीआयचं म्हणणं आहे. वैद्यकीय प्रवेश परीक्षेची प्रश्नपत्रिका विद्यार्थ्यांना देऊन त्यांच्या पालकांकडून पैसे वसूल केल्याचा आरोप त्याच्यावर आहे. या प्रकरणाची पुढील सुनावणी गुरुवारी दिल्ली विशेष न्यायालयात होणार आहे.

<><><><>

भारत आणि वेस्ट इंडीज यांच्यातल्या टी-२० क्रिकेट मालिकेतला चौथा सामना आज हैदराबाद इथं होणार आहे.  राजीव गांधी आंतरराष्ट्रीय मैदानावर संध्याकाळी सात वाजता सामना सुरु होईल. या मालिकेत २ सामने जिंकून भारताने आघाडी घेतली आहे.

<><><><>

बिहारच्या वैशाली जिल्ह्यात राघोपूर दियारा इथं काल रात्री गंगा नदीत बोट उलटल्याने झालेल्या दुर्घटनेत १३ जणांचा मृत्यू झाला. मृतांमध्ये प्रामुख्याने अल्पवयीन मुलांचा समावेश

आहे. ७ जणांना वाचवण्यात यश आल असून त्यानं उपचारासाठी रुग्णालयात दाखल करण्यात आलं आहे.

उपराष्ट्रपती सी. पी. राधाकृष्णन आणि प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी या दुर्घटनेबद्दल तीव्र दुःख व्यक्त केलं आहे. मृतांच्या कुटुंबांना २ लाख रुपये आणि जखमींना प्रत्येकी ५० हजार रुपयांची मदत प्रधानमंत्री सहायता निधीतून जाहीर केली आहे. बिहार राज्य सरकारने मृतांच्या कुटुंबांना प्रत्येकी ४ लाख रुपयांची मदत जाहीर केली आहे.

<><><><><>

थकीत देयकांसाठी येत्या १९ तारखेला आंदोलन करण्याचा निर्णय राज्यातल्या कंत्राटदारांनी घेतला आहे. सर्व जिल्हाधिकारी कार्यालयांवर यादिवशी मोर्चे काढले जाणार आहेत. राज्य सरकारनं कंत्राटदारांची सुमारे ९६ हजार कोटी रुपयांची देणी थकवली आहेत, असा आरोप राज्य कंत्राटदार संघटनेचे अध्यक्ष मिलिंद भोसले यांनी केला. आर्थिक तणावामुळे गेल्या १० महिन्यांत ९ कंत्राटदारांनी आत्महत्या केल्याचंही त्यांनी संगितलं.

//<><><><><>//